सोमवार दि. ३१ ऑगस्ट २०१५

गोवन वार्ता

रजिस्टर ४

# समाजाचे ऋण फेडण्याचा प्रयत्न करा

## वित्त राज्यमंत्री दीपक केसरकर यांचे आवाहन; दोडामार्गात आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा

वार्ताहर
गोवन वार्ता



**दोडामार्ग** : जीवनात कोणतेही काम करताना कधीही कमीपणा बाळगता कामा नये. जीवनात यशस्वी व्हायचे असेल, तर कामाशी एकनिष्ठ राहून ते प्रामाणिकपणे पूर्ण केले पाहिजे. माणूस हा समाजाचा अविभाज्य घटक आहे. समाजाच्या त्याच्याकडून अनेक अपेक्षा असतात. तो नेहमीच समाजाचे देणे लागत असतो. समाजाचे ऋण फेडण्यासाठी प्रत्येकाने नेहमीच प्रयत्नशील राहिले पाहिजे, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे वित्त राज्यमंत्री तथा सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर यांनी केले.

मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना व लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात आयोजित दोन दिवशीय जिल्हास्तरीय आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभात उद्घाटक या नात्याने ते बोलत होते.

पुढे बोलताना केसरकर म्हणाले, मानवी आणि नैसर्गिक आपत्तींना सामोरे जाण्याचे मनोबल प्रत्येकात निर्माण झाले पाहिजे. सिंधुदुर्ग जिल्ह्याचा पर्यटन विकास होण्यासाठी तरुणांनी प्रशिक्षित होऊन पुढाकार घेतला पाहिजे. देशाच्या विकासात तरुणांचे योगदान महत्त्वाचे आहे. मात्र, हा विकास साधण्यासाठी निसर्ग आणि उद्योग यांची योग्य सांगड घालणे गरजेचे आहे, असे ते म्हणाले. यावेळी महाविद्यालयाश सर्वतोपरी सहकार्य करण्याचे व आमदार निधीतून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक साहित्यासाठी पाच लाख रुपयांचा निधी देण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. कार्यक्रमाचे अध्यक्ष भाई परमेकर यांच्याहस्ते पालकमंत्री केसरकर यांचा सत्कार करण्यात आला. तर प्रा. डॉ. व्ही. ए. पाटील यांच्याहस्ते मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे समन्वयक प्रा. बी. एस. बिडवे यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

### 'म. गांधींचे स्वप्न पूर्ण करा'

महात्मा गांधींनी 'खेड्याकडे चला' असा संदेश दिला, कारण खेडी स्वयंपूर्ण झाली, तरच देश स्वयंपूर्ण होईल, हे त्यांनी जाणले होते. म. गांधींचे हे स्वप्न आता सत्यात उतरणे गरजेचे आहे. त्यासाठी तरुणांनी आपल्या गावच्या गरजा ओळखून त्या पूर्ण करण्याचा प्रयत्न केला पाहिजेत. गावामध्ये बदल करण्याची क्षमता केवळ तरुणांमध्येच असते, असे ते म्हणाले. महात्मा गांधींनी 'खेड्याकडे चला' असा संदेश दिला, कारण खेडी स्वयंपूर्ण झाली, तरच देश स्वयंपूर्ण होईल, हे त्यांनी जाणले होते. म. गांधींचे हे स्वप्न आता सत्यात उतरणे गरजेचे आहे. त्यासाठी तरुणांनी आपल्या गावच्या गरजा ओळखून त्या पूर्ण करण्याचा प्रयत्न केला पाहिजेत. गावामध्ये बदल करण्याची क्षमता केवळ तरुणांमध्येच असते, असे ते म्हणाले.